पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७७६ दिनांक - ३१/१०/२०२३**

चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर

## सागर दत्ता चांदणे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर १० साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रांसह चतुःश्रृंगी माता मंदिर येथे तोरण अर्पण करुन घरी जात असताना फिर्यादी यांना सागर दत्ता चांदणे व त्याचे इतर १० साथीदार यांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन थांब तुझा मर्डर करतो असे म्हणुन त्याचे हातातील धारधार शस्त्राने फिर्यादी यांना जीवे मारणेच्या उददेशाने फिर्यादी यांचे डोक्यात वार करुन त्यांना गंभीर जखमी केले व हातामधील शस्त्र हवेत फिरवून कोण मध्ये पडला तर त्याला पण मारून टाकेन असे बोलून धमकी दिली त्याबाबत चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.रजि.नं.७५१/२०२३ भा.दं.वि.स.कलम ३०७,३२३,१४१,१४३,१४४,१४७,१४८,१४९ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील निषन्न आरोपी नामे **१) सागर दत्ता चांदणे, वय २४ वर्ष, रा खडकी बाजार पुणे (टोळी प्रमुख) २) यश ऊर्फ मोन्या प्रविण गोपनारायण,वय १९ वर्ष,रा खडकी बाजार पुणे ३) ऋषी किरण बिवाल,वय १९ वर्ष,रा.खडकी बाजार पुणे ४) आयुष ऊर्फ बंटया नागेश लांडगे, वय १९ वर्ष रा.खडकी बाजार,पुणे. (टोळी सदस्य) यांना अटक करण्यात आली असुन** इतर सात पाहिजे आरोपीचा शोध सुरु आहे.

वरील आरोपीचे पुर्व रेकॉर्ड पाहणी करीता आरोपी **सागर दत्ता चांदणे (टोळी प्रमुख)** व त्याचे साथीदारासह त्याने बेकायदेशीर मार्गाने अवैध आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने, भोसरी व चतुःश्रृंगी या भागात आपले गुन्हेगारी वर्चस्व निर्माण करणेचे उददेशाने गुन्हयातील साथीदार आरोपीतांना स्वतःबरोबर घेवून स्वतःचे अधिपत्याखाली आपली संघटित गुन्हेगारी टोळी स्थापन केलेली आहे.सदर भागातील लोकांना मारहाण करुन दहशत निर्माण करणे,लुटालुट करणे, त्यांचे विरुध्द मालाविरुद्धचे तसेच शरीराविरुद्धचे गंभीर गुन्हे दाखल आहेत यातील नमुद सदस्यांवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांनी पुन्हा-पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

दाखल गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३ (२) ३ (४) अर्तंभाव करणे कामी चतुःश्रृंगी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री.बालाजी पांढरे यांनी पोलिस उपायुक्त परिमंडळ ०४ पुणे श्री. शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलिस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर गुन्हा रजि क्र ७५१/२०२३ भा.दं.वि.स.कलम ३०७,३२३,१४१,१४३,१४४,१४७,१४८,१४९ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२)३(४) अर्तंभाव करण्याची मा.अपर पोलिस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग पुणे शहर श्रीमती आरती बनसोडे ह्या करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार,मा.सह-पोलीस आयुक्त श्री. संदिप  कर्णीक, मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप-आयुक्त परी-४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे,मा.सहायक पोलीस आयुक्त,श्रीमती आरती बनसोडे यांचे मार्गदशनाखाली चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बालाजी पांढरे, पोलीस निरीक्षक गुन्हे, श्री अंकुश चिंतामण,श्री. जगन्नाथ जानकर, निगराणी पथकाचे सहा.पोलिस निरीक्षक रत्नदीप गायकवाड,पो.उपनिरीक्षक सचिन गाडेकर,पोलीस अमंलदार अमित गद्रे व सुहास पवार यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालय पुणे शहराचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून, गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ७४ वी कारवाई आहे.**